# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/11/2022 (बुधवार) सकाळ

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०४ कि.मी अंतरावरील रेल्वे बोगदया जवळील चिंचेच्या झाडाजवळ, चनकापूर येथे दिनांक ०८/११/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– १) रोहीत देशराज सुर्यवंशी, २) आशिष उर्फ गुल्लू वर्मा ३) सुरज उर्फ मुसावरणकर, तिन्ही रा. चनकापूर ता. सावनेर जिल्हा नागपूर सन– २०१८ मध्ये गदा उर्फ अशोक पासवाण याचा खुन करून त्याचे डोके धडावेगळे करून मोहल्ल्यात फिरविले होते. त्या घटनेत यातील फिर्यादीने मृतकाच्या घरच्यांना अंत्यविधी करीता मदत केली होती. त्यामुळे आरोपी याचा फिर्यादी याच्यावर राग होता. दिनांक ०८/११/२०२२ रोजी यातील फिर्यादी नामे– मो. लईक अब्दूल लतिफ सिदधीकी, वय ३२ वर्ष, रा. चनकापूर कॉलनी, पिपळा लाईन, डब्ल्यूसीएल क्वॉर्टर नं. ११५/२ चनकापूर, ता. सावनेर जिल्हा यांच्या मुलीचा विवाह असल्याने तिथे हळदीच्या कार्यक्रमात जेवण करून आपल्या मोपेड गाडीने कामावर दहेगाव रंगारी येथे जाण्याकरीता निघाला असता संध्याकाळी १६.०० वा. चे सुमारास चनकापूर येथील रेल्वेबोगदयाच्या अलीकडील चिंचेच्या झाडाजवळ मोपेड गाडीची हवा चेक करण्याकरीता थांबला असता यातील आरोपी रोहीत सुर्यवंशी याने फिर्यादीस हाताने मारहाण केली. तसेच अन्य आरोपी आशिष उर्फ गुल्लू वर्मा याने सुदधा फिर्यादीस मारहाण केली. त्यावेळी फिर्यादी हा तेथून पळून त्याच्या घराकडे निघून गेला. फिर्यादी याने त्याच्या सोबत झालेली घटना त्याचे दोन्ही भाऊ व वडील यांना सांगितली. त्यांनतर फिर्यादी, त्याचे दोन्ही भाऊ व वडील हे पोलीस स्टेशनला येत असतांना त्यांनी आरोपी रोहीत सुर्यवंशी याला पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपी रोहीत सुर्यवंशी हा त्यांच्यासोबत झटापटी करून पळून गेला. त्यांनतर फिर्यादी, त्यांचे दोन्ही भाऊ व वडील हे पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरीता येत असतांना त्यांना आरोपी रोहीत सुर्यवंशी यांचे मित्र आशिष उर्फ गुल्लू वर्मा, सुरज उर्फ मुसावरणकर हे त्यांच्या दिशेने येतांना दिसले. त्याच्या सोबत रोहीत सुर्यवंशी हा सुदधा होता. त्यावेळी आरोपी आशिष उर्फ गुल्लू वर्मा याच्याजवळ गावठीकटटा व सत्तूर होता. आरोपी यांनी जवळ येवून फिर्यादी, त्याचा भाऊ, वडील यांच्या दिशेने दगड फेकायला सुरूवात केली. त्यांनतर आरोपी आशिष उर्फ गुल्लू वर्मा, याने त्याच्या जवळ असलेल्या गावठी कटटयाने फिर्यादी यांचा भाऊ मो. तहजिब यांच्याकडे रोखून फायर करण्याचा प्रयत्न केला. परंतू फायर झाला नाही. म्हणून अन्य आरोपी रोहीत सुर्यवंशी याने आशिष याच्याकडील गावठी कटटा स्वत:च्या हातात घेवून फिर्यादी याचा भाऊ मो. तहजिब याच्यावर फायर करण्याचा प्रयत्न केला. परंतू फायर झाला नाही. त्यावेळेस फिर्यादी, त्याचे दोन भाऊ व वडील हे भितीमुळे तेथून पळून गेले. त्यांनतर फिर्यादी हे त्याच्या भावासह पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरीता आल्याने उपरोक्त गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३३६, ३२३, ३४, भा.द.वि. सहकलम ३/२५, ४/२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २) याला अटक करण्यात आली असून आरोपी क्र. ०१) व ३) यांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन खापरखेडा करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत रामटेक रोड क्रिष्णा इंटरप्रायजेस समोर, मौदा येथे दिनांक ०८/११/२०२२ चे १२.०० वा. ते १२.३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे— तेजेश्वर कृष्णराव राकोहाड, वय २८ वर्ष, रा. बाबरे पेट्रोलपंप, वंजारी लेआउट मौदा जि. नागपुर ही दिनांक ०८/११/२०२२ रोजी माजी मंत्री बावनकुळे यांचे सभे करीता जाण्यासाठी आपले घरून निघाली असता बस स्टॉप जवळ फिर्यादीला एक तोंडाला काळया रंगाचा दुपट्टा व कथ्थ्या रंगाची साडी घातलेली एक अनोंळखी महीलेने हातचालाखी करून रामटेक रोड वरील क्रिष्णा इंटरप्रायजेस समोर गळयातील ३० वर्ष पुर्वी विकत घेतलेले सोन्याचे मंगळसुत्र ०७ ग्रॅम किमती अंदाजे ७०००/—रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात महिला आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात महिला आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**